## नियमित दिवाणी दावा क्र.१५१/२०१७ मधील निशाण क्र.७७ खालील आदेश

[ CNR No.MHKO090002562017 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ मार्फत ''उलटतपास नाही'' चा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. प्रतिवादी क्र.३ यांचे थोडक्यात असे कथन आहे की, त्यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास न घेतल्यामुळे त्यांचेविरुध्द 'उलटतपास नाही' चा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी क्र.३ हे मार्केटींग कंपनीत नोकरीस आहेत व ते कंपनीच्या कामासाठी बेंगलोर येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे मुदतीत वकिलांना भेटून ते कामासंबंधी माहिती देवू शकले नाहीत. प्रस्तुतचे काम गुणदोषावर चालून निर्णय होणेसाठी प्रतिवादी यांना संधी मिळणे गरजेचे आहे. सबब न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाही''चा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत नि.७९ अन्वये तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा व कपोलकल्पित आहे. अर्जातील कथने संयुक्तिक नाहीत. प्रस्तुतचे प्रकरण सन २०१७ पासून प्रलंबित आहे. प्रतिवादी यांनी हेतुपुरस्सर सदरचे काम लांबविले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रकरणात

पुरावा दाखल केल्यानंतर पुरेशी संधी देवून त्यानंतर ''उलटतपास नाही'' चा आदेश पारीत करणेत आला. अशा परिस्थितीत, प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करणे संयुक्तिक ठरत नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात क्लिष्ट स्वरुपाचे मुद्दे उपस्थित असल्याने न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस एक संधी देणे क्रमप्राप्त ठरते. योग्य तो दंड आकारून ''उलटतपास नाही'' चा आदेश रद्द केलेस न्यायोचित ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/- (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी क्र.३ यांचेविरुध्द झालेला ''उलटतपास नाही'' चा आदेश रद्द करणेत येत आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी पुढील तारखेस न चुकता उलटतपास घ्यावा.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.03.25 11:47:24 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : २४.०३.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज